प्रतिभा व्यवस्थापन धोरण, २०२३
राज्यातील शासकीय वैद्यकीय, आयुर्वेद आणि दंत महाविद्यालये व संलग्नित रुग्णालये यांच्या मानवी संसाधनांच्या व्यवस्थापनासाठी धोरणात्मक उपाययोजना

# महाराष्ट्र शासन
## वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
## शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१०२३/प्र.क्र.२७३/वैसेवा-३

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : १७ ऑक्टोबर २०२३.

**पार्श्वभूमी:-** राज्यातील शासकीय वैद्यकीय, आयुर्वेद व दंत महाविद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना उच्च दर्जाचे शिक्षण देण्यासाठी व त्याचबरोबर नागरिकांना आरोग्यविषयक सर्वसमावेशक सेवा उपलब्ध करून देण्यासाठी आणि नवनवीन संशोधन करण्यास चालना देण्याकरीता आवश्यक प्रशिक्षण, अनुभव आणि कौशल्य आधारित सर्वोत्तम मनुष्यबळ उपलब्ध करण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. गुणवत्ता आधारित कुशल मनुष्यबळ निर्माण करणे, अधिकारी व कर्मचारी वर्गाची संख्या वाढविणे व त्यासाठी कामाचे पोषक वातावरण निर्माण करणे हे शासनाचे मुख्य उदिष्ट आहे. त्यासाठी राज्यातील शासकीय वैद्यकीय, दंत व आयुर्वेद महाविद्यालये व संलग्नित रुग्णालये यांच्या मानवी संसाधनांच्या व्यवस्थापनासाठी धोरणात्मक उपाययोजना करण्याकरीता **प्रतिभा व्यवस्थापन धोरण, २०२३** लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

धोरणाचा उद्देश:-

वस्तुनिष्ठ नियोजन आणि रणनीती कार्यान्वित करून कर्मचारी व्यवस्थापन सशक्त करण्यासाठी शासन राज्यातील सर्व वैद्यकीय संस्थांकरीता उन्नत प्रतिभा व्यवस्थापन धोरण तयार करीत आहे. मनुष्यबळाची कमतरता कमी करणे, दर्जेदार शिक्षण प्रदान करणे, आरोग्यविषयक संशोधन करणे आणि अधिकाऱ्यांची /कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता मजबूत करणे हे या धोरणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. यामधील प्रमुख बाबी खालीलप्रमाणे आहेत:-

१. धोरणाची व्याप्ती

२. दृष्टिकोन

३. धोरणाची उद्दिष्टे

४. प्रशिक्षित व कार्यक्षम मनुष्यबळ उभारणे

५. नियमित अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी नवीन धोरणात्मक सुधारणा

   ५.१. वस्तुनिष्ठ धोरणात्मक कार्यपद्धतीचे नियोजन

   ५.२. कर्मचाऱ्यांची उपलब्धता सुनिश्चिती

५.३. अधिकारी व कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वृद्धी

५.४. प्रतिभा व्यवस्थापनासाठी डिजिटल माध्यमांचा लाभ

६. कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी नवीन धोरणात्मक सुधारणा

## १. धोरणाची व्याप्ती

हे धोरण प्रतिभा व्यवस्थापनाच्या सर्व पैलूंशी संबंधित आहे- "हायर टू रिटायर"

- मनुष्यबळ नियोजन
- भरतीप्रक्रिया
- वेतन आणि सुविधा
- कार्यक्षमता निर्मिती
- नियुक्ती, बदली आणि प्रतिनियुक्ती
- कामगिरीचे व्यवस्थापन
- मुल्यमापन व पदोन्नती
- सेवानिवृत्ती

हे धोरण महाराष्ट्रातील वैद्यकीय संस्थांमधील खालील मानवी संसाधने (यापुढे "कर्मचारी" म्हणून संदर्भित) यांचेसाठी (संपूर्णपणे किंवा काही ठिकाणी) लागू असेल:-

अ) प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक, सहायक प्राध्यापक

ब) शिक्षकेतर प्रमुख प्रशासकीय पदे म्हणजे, अधिष्ठाता/ संचालक/ सहसंचालक / वैद्यकीय अधीक्षक

क) वरिष्ठ निवासी, कनिष्ठ निवासी

ड) परिचर्या आणि तांत्रिक मनुष्यबळ

इ) अ-तांत्रिक-तांत्रिक आणि सहायक कर्मचारी

ई) कंत्राटी मनुष्यबळ (वरील सर्व श्रेणींसह)

## २. दृष्टिकोन

महाराष्ट्रातील वैद्यकीय, दंत आणि आयुर्वेद महाविद्यालयांना त्यांच्या शिक्षण, संशोधन आणि रुग्ण सेवेमुळे जागतिक दर्जाच्या संस्थांमध्ये स्थान मिळवून देणे हा सदर धोरणाचा दृष्टीकोन आहे. या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांची ओळख खालीलप्रमाणे असेल:-

अ) पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यांचा पहिला प्राध्यान्यक्रम (पसंती/निवड)

ब) उच्च-गुणवत्तेचे शिक्षण आणि संशोधन वाढवण्यासाठी सर्व सोयी सुविधायुक्त केंद्रे

क) उच्च प्रतीची रूग्ण सेवा देणारी सर्वोत्कृष्ट श्रेणीतील रुग्णालये

ड) कार्यक्षम व प्रशिक्षित अधिकारी/कर्मचारी वर्ग

## ३. धोरणाची उद्दिष्टे

या धोरणाची उद्दिष्ट खालीलप्रमाणे आहे:-

अ) केंद्र शासनाच्या नियमांनुसार आवश्यक अधिकारी व कर्मचारी नेमून राज्यातील सर्व वैद्यकीय संस्थांमध्ये त्यांचा वापर सुनिश्चित करणे

ब) दर्जेदार शिक्षण, वैद्यकीय क्षेत्राशी सुसंगत असणारी कौशल्ये आणि संशोधनाला चालना देण्यासाठी आवश्यक प्रशिक्षण, अनुभव आणि कौशल्य असलेल्या सर्वोत्कृष्ट श्रेणीतील अधिकारी कर्मचाऱ्यांसह वैद्यकीय संस्थांना सक्षम करणे

क) अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देणे ही उद्दिष्टे खालील मार्गदर्शक तत्वांद्वारे राबविण्यात येतील:-

- विविध फायदे व सोयी-सुविधा देऊन दर्जेदार सेवा बजावणारे अधिकारी/कर्मचारी यांना सेवेत येण्यासाठी आकर्षित करणे
- अधिकारी /कर्मचारी यांची सुनियोजीत पध्दतीने भरती करणे
- अधिकारी /कर्मचाऱ्यांचे समाधान आणि प्रोत्साहन यावर विशेष लक्ष देणे
- गरजेनुसार कार्यक्षमता वाढविणे

  प्रभावी आणि कार्यक्षम मनुष्यबळ व्यवस्थापनासाठी नवीन-युगातील डिजिटल साधनांचा लाभ घेणे

## ४. प्रशिक्षित व कार्यक्षम मनुष्यबळ उभारणे

शासनाने अलीकडेच राज्यातील वैद्यकीय संस्थांच्या मनुष्यबळासाठी खालील धोरणात्मक उपक्रम हाती घेतले आहेत:-

अ) भरती प्रक्रिया राबविण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगामध्ये शासकीय वैद्यकीय, आयुर्वेद व दंत विभागाशी संबंधित महाविद्यालय व रुग्णालयांमध्ये अध्यापकीय व वैद्यकीय पदांच्या भरतीसाठी स्वतंत्र कक्ष तयार करण्यात येत आहे.

ब) सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक आणि प्राध्यापकांना शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये कंत्राटी नियुक्तीसाठी आकर्षक वेतन दिले जाईल. शासकीय दंत व आयुर्वेद महाविद्यालयातील कंत्राटी प्राध्यापकांच्या वेतनातही वाढ करण्यात येईल.

क) नियुक्तीसाठी विकल्प उपलब्ध करुन देण्यात येईल. आदिवासी व दुर्गम भागात सेवा देणारे अधिकारी/कर्मचारी (गट अ आणि गट ब, गट क आणि गट ड मधील अधिकारी/कर्मचाऱ्यांसाठी तीन वर्षे) हे पसंतीप्रमाणे नियुक्ती/पदस्थापना घेण्यासाठी पात्र असतील.

ड) आदिवासी आणि दुर्गम भागात सेवा देणाऱ्यांना आर्थिक प्रोत्साहन भत्ता

इ) कामगिरीवर आधारित प्रोत्साहन भत्ता देण्यासाठी वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभागांतर्गत संस्थांना प्राप्त झालेल्या विमा रकमेपैकी २०% रक्कम संबंधित संस्थांमध्ये रुग्ण सेवा प्रदान करणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन देण्यासाठी वापरण्यात येणार आहे.

## ५. नियमित कर्मचाऱ्यांसाठी नवीन धोरणात्मक सुधारणा

राज्यातील वैद्यकीय संस्थांसाठी मनुष्यबळ उपक्रमांची खालील चार क्षेत्रामध्ये मांडणी करण्यात आली आहे:-

१. वस्तुनिष्ठ धोरणात्मक कार्यप्रणालीचे नियोजन

२. कर्मचाऱ्यांची उपलब्धता यांची सुनिश्चिती

३. कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढवण्यावर भर

४. प्रतिभा व्यवस्थापनासाठी डिजिटल माध्यमांना प्रोत्साहन

### ५.१ वस्तुनिष्ठ धोरणात्मक कार्यप्रणालीचे नियोजन

अ) धोरणात्मक कार्याचे नियोजन आणि निर्णय घेण्यासाठी वेळोवेळी माहितीचे आणि पुराव्यांचे सर्वसमावेशक विश्लेषण केले जाईल. यासाठी, आरोग्य श्रम बाजार विश्लेषण (Health Labour Market Analysis - HLMA) माहितीचे स्त्रोत ठरतील.

ब) सर्वसमावेशक सेवा पुरविण्यासाठी, भौगोलिक साथीच्या रोगांवर उपचार करण्यासाठी, नवीन आरोग्य संस्था स्थापन करण्यासाठी आणि राष्ट्रीय वैद्यकीय आयोग (नॅशनल मेडिकल कमिशन-NMC) सह नियामक एजन्सीचे नियम विकसित करणे यासारख्या घटकांचा विचार करून वर्तमान आणि भविष्यातील मनुष्यबळ मागणी यांची पूर्तता करण्यात येईल.

क) अर्थसंकल्पातील निधीची तरतूद, संवर्गनिहाय पदांची मंजूरी, विद्यमान पदे आणि रिक्त पदे, भरती प्रक्रिया, सेवानिवृत्ती, नियोजित पदव्युत्तर (PG) जागा विस्तार आणि स्थलांतर यासारख्या घटकांचा विचार करून मनुष्यबळ पुरवठ्याची माहिती मिळवली जाईल.

५.२ कर्मचाऱ्यांची उपलब्धता सुनिश्चित करणे

खालील उपाययोजनांद्वारे वैद्यकीय संस्थांमध्ये मनुष्यबळ उपलब्धतेतील अंतर भरून काढण्यात येईल:-

५.२.१ अधिकारी/कर्मचाऱ्यांना आकर्षित करण्यासाठी उपाययोजना

दुर्गम भागातील वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयात मनुष्यबळाला आकर्षित करण्यासाठी आणि टिकवून ठेवण्यासाठी अनेक फायदे उपलब्ध करुन देण्याच्या योजना प्रस्तावित आहे. त्यामध्ये खालील मुद्दे समाविष्ट असतील. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात काम करण्यासाठी अध्यापकीय व कर्मचारीवर्ग आकर्षित करण्याकरीता उपाययोजना सुचविण्यासाठी आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे.

अ) सेवाकाळात विकासासाठी संधी

स्थानिक/राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय परिषद/सेमिनार/कार्यशाळा (निर्धारित मर्यादेत, निवडक कर्मचारी यांचेसाठी)

- संस्थात्मक सहकार्याद्वारे अध्यापक वर्ग यांची देवाणघेवाण आणि संशोधन संधी
  सेंटर ऑफ एक्सलन्सवर प्रतिनियुक्ती

ब) इतर फायदे:

- प्रमाणपत्र/पुरस्कार/ कौतुकाची थाप देणारी पत्र
- दुर्गम भागातील आरोग्य संस्थांमध्ये कर्मचारी आणि कुटुंबासाठी निवास
- पती-पत्नी यांना एकाच ठिकाणी नियुक्तीसाठी प्राधान्य
- इतर प्रकारचे आर्थिक व इतर प्रोत्साहन
- दुर्गम भागात सेवा बजावणाऱ्या कर्मचाऱ्यांना एक ठराविक मानधन ठरवून वरीलप्रमाणे निवडक फायदे देऊन आकृष्ट करण्याचा मानस आहे.

५.२.२ भरती आणि पदोन्नतीसाठी संरचनात्मक आणि प्रक्रिया पुनर्रचना

सर्व थेट भरती आणि पदोन्नती खालीलप्रमाणे सुव्यवस्थित आणि जलद मार्गी लावण्याचे नियोजित आहे:

- द्वि-वार्षिक थेट भरती
- वर्षातून एकदा विभागीय पदोन्नती समितीची बैठक आयोजित करणे

- पदोन्नतीसाठी अतिरिक्त निकष (उदा. विद्यार्थ्यांचा अभिप्राय, एच-इंडेक्स, पदव्युत्तर परीक्षेतील गुण, कालावधी आणि सरकारी सेवेचे स्थान यासारखे आधारभूत निकष करण्यात येईल)
- सेवा काळातील प्रगती (निश्चित कार्यकाळासह पदनाम/ पगारात बदल, पात्रता/रिक्त पदांच्या अधीन लागू)
- डिजीटल भरती प्रक्रिया

५.३ कर्मचाऱ्यांची क्षमता वाढविण्यावर भर

शासकीय वैद्यकीय, आयुर्वेद, दंत आणि संबंधित महाविद्यालय स्तरावरील कर्मचाऱ्यांच्या प्रशिक्षणाच्या गरजा ओळखणे आणि त्यानुसार या गरजा पूर्ण करण्यासाठी त्यांना सक्षम करणे आवश्यक आहे. यामध्ये खालील बाबी समाविष्ट असतील:

**अ) प्रशिक्षणाची आवश्यकता यांचे मूल्यांकन आणि विश्लेषण**

- प्रमाणित साधन वापरून मुख्य क्षेत्रांमध्ये कर्मचारी प्रशिक्षणाच्या गरजा ओळखणे आवश्यक ठरेल (यात अध्यापन, चिकित्सालयीन कौशल्ये, प्रशासकीय कौशल्ये आणि संशोधन यांचा समावेश असेल)
- विश्लेषणावर जोर आवश्यक (उदा. कर्मचाऱ्यांनी शासकीय वैद्यकीय, आयुर्वेद, दंत आणि संबंधित महाविद्यालय निहाय प्रशिक्षण स्थितीची माहिती ठेवावी)

ब) कर्मचाऱ्यांमध्ये क्षमता निर्माण करण्याला प्राधान्य

प्रशिक्षण गरजा आणि आधारभूत आंतर विश्लेषणाच्या अनुषंगाने कर्मचाऱ्यांच्या क्षमता वाढीसाठी विविध उपक्रमात प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. यामध्ये खालील संधींचा समावेश असेल:

- अध्यापकीय वर्गाच्या विकासाच्या दृष्टीने केंद्र शासनाच्या निकषांची पूर्तता करण्यासाठी प्रशिक्षणासंबंधीत कर्मचाऱ्यांचे नामांकन (उदा. वैद्यकीय महाविद्यालयातील प्राध्यापकांसाठी Basic Course in Medical Education-BCME, Advance Course in Medical Education-ACME, Curriculum Implementation Support Programme-CISP प्रशिक्षण)
- विविध शैक्षणिक माध्यमांमध्ये प्रवेश (उदा. व्हर्च्युअल कम्युनिटीज ऑफ प्रॅक्टिस; Massive Open Online Courses-MOOC यांच्याशी संस्थात्मक भागीदारीला प्राधान्य)

क) प्रभावी मूल्यांकन

प्रशिक्षण परिणामकारकतेचे मूल्यांकन, परिणाम आणि सतत गुणवत्ता सुधारणा सुलभ करण्यासाठी प्रमाणित साधने वापरून क्षमता निर्माण करणाऱ्या उपक्रमांचे मूल्यांकन.

### ५.४ प्रतिभा व्यवस्थापनासाठी डिजिटल माध्यमांचा लाभ

शासकीय वैद्यकीय संस्थांमधील व्यवस्थापनात सुसूत्रता आणण्यासाठी आणि कार्यक्षमता वाढवण्यासाठी अनेक डिजिटल साधने येत्या काही महिन्यात कार्यरत करण्यात येणार आहे. यामध्ये खालीलप्रमाणे इंटरऑपरेबल डिजिटल प्लॅटफॉर्मचा समावेश असेल:-

- रिक्त पदांची स्थिती, जाहिराती, ऑनलाइन अर्ज, शासकीय पदांच्या भरतीबाबत अपडेट्स, मुलाखतीच्या तारखा, निवडलेल्या उमेदवारांची यादी इत्यादीसह भरती प्रक्रियेची माहिती
- प्रशिक्षण दिनदर्शिकेसह लर्निंग मॅनेजमेंट सिस्टीम, कर्मचारी प्रशिक्षणाची स्थिती, अभ्यासक्रम यादी, अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी माहितीपत्रक आणि प्रशिक्षणपूर्व आणि नंतरचे मूल्यांकन
- मनुष्यबळ व्यवस्थापन प्रणाली (एचआरएमएस) यामध्ये विभागवार कर्मचाऱ्यांची यादी, पे-स्लिप तयार करणे, प्रोत्साहन/भत्ते वितरण, कामगिरी नोंदी, बदली/नियुक्ती/प्रतिनियुक्ती, रजा व्यवस्थापन आणि तक्रार निवारण यांचा समावेश असेल.

राज्यातील वैद्यकीय संस्थांनी डिजिटल साधने तैनात करणे आणि योग्य वेळेत या साधनांच्या वापरासाठी आणि प्रशिक्षणासाठी कर्मचारी नियुक्त करणे आवश्यक आहे.

### ६. कंत्राटी अधिकारी/ कर्मचाऱ्यांसाठी नवीन धोरणात्मक सुधारणा

शासकीय सेवेत असणाऱ्या अधिकारी/ कर्मचाऱ्यांप्रमाणे काही धोरणात्मक सुधारणा कंत्राटी कर्मचाऱ्यांना देखील लागू होऊ शकतात, याप्रमाणे खालील धोरणात्मक सुधारणा केवळ कंत्राटी कर्मचाऱ्यांना लागू होतील:-

**अ) कारकीर्द विकासाची संधी**

कायमस्वरुपी सेवेतील भरतीदरम्यान कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी अतिरिक्त गुण/सेवेत घेण्यासाठी प्राधान्य देण्याकरीता योजना राबविण्यात येईल.

**ब) कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी वर्षभर थेट (वॉक-इन) मुलाखती**

प्रस्तुत शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून त्याच्या अंमलबजावणी कार्यप्रणालीसह सर्वसमावेशक मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यासाठी आयुक्त, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन संचालनालय यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन केली जाईल. ही समिती प्रस्तुत शासन निर्णयातील तरतूदीबरोबर खाली नमूद केलेल्या मुद्यावर अभ्यास करुन भविष्यातील नियुक्तीसाठी करावयाच्या सुधारणांबाबत शासनास प्रस्ताव सादर करेल.

१. कालबद्ध कारकीर्द प्रगती / पदोन्नती (यात पगार/पद, पगारवाढ इत्यादी निकष यांचा समावेश असेल)

२. श्रेणीबद्ध पदोन्नती निश्चित करण्यासाठी गुणवत्ता/ सेवा निकषांचा समावेश

३. आर्थिक प्रोत्साहने (उदा. संघ-आधारित प्रोत्साहन)

४. कंत्राटी कर्मचाऱ्यांसाठी इतर सुधारणा (यात भरती प्रक्रिया, नियुक्ती आणि बदली यांचा समावेश असेल)

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( शिवाजी पाटणकर )
सहसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.मंत्री, वैद्यकीय शिक्षण यांचे स्वीय सहायक
२. आयुक्त, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
३. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई
४. अधिष्ठाता, सर्व शासकीय वैद्यकीय/दंत/आयुर्वेद महाविद्यालये व रुग्णालये
५. निवडनस्ती (संबंधित कार्यासन)